# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एनजीपी/नॉन एआयसीटीई/ मान्यता/२००७/ ९६५
दिनांक : 19 जुलाई 2007

प्रति,
✓प्राचार्य,
बॉम्बे सर्बन आर्ट ॲण्ड क्राफ्ट एज्युकेशन सो.,
एल.एस रहेजा स्कूल ऑफ आर्किटेक्चर,
सेंट मार्टिंग रोड,
बांद्रा (प.), मुंबई ५०

**विषय :** शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत नसलले अल्पमुदतीचे अर्धवेळ/ पूर्णवेळ पदविका/ पदव्युत्तर पदवी हे नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत..

**संदर्भ :**
१. शासन निर्णय क्रमांक मान्यता २००५/(१६२/०६) तांशि ६, दिनांक २०.९.२००६
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक १०/ नॉन एआयसीटीई/ मान्यता/ २००६/५६७,दिनांक ९.१०.२००६
३. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता २००६/(१६२/०६) तांशि ६, दिनांक ११.६.२००७

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००६-०७ साठी खालील अभ्यासक्रमास त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधीन राहून परवानगी दिली होती. तथापी, शासन निर्णय उशिराने निर्गमित झाल्यामुळे सदर अभ्यासक्रम सुरु करणे शक्य झालेले नसल्यामुळे शासनाने क्रमांक ३ च्या शासन पत्रान्वये निर्गमित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने सदर अभ्यासक्रम शैक्षणिक २००७-०८ पासून सुरु करण्यास क्रमांक १च्या शासन निर्णयातील तसेच खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | डिप्लोमा इन इंटेरिअर डिझाइन ॲण्ड डेकोरेशन (३ वर्षे, अर्धवेळ, वार्षिक पध्दत) | ९०-१२० |

या संचालनालयाच्या संदर्भाधीन क्रमांक २ च्या पत्रान्वये दिलेल्या परवानगीस अनुसरुन आपण संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अध्यक्ष, बॉम्बे सर्बन आर्ट ॲण्ड क्राफ्ट एज्युकेशन सो., मुंबई यांच्या संयुक्त खात्यात वरील अभ्यासक्रमासाठी रुपये १.०० लाख युनियन बँक ऑफ इंडिया, मुंबई शाखा येथे पावती क्रमांक : ७३९६२८ दिनांक २१.१२.२००६ अन्वये ५ वर्षे मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून उपरोक्त नमूद केलेला अभ्यासक्रम सन २००७-०८ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.
२. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता त्यांच्या नांवासमोर नमूद केलेल्या प्रवेश क्षमतेएवढी मर्यादित राहिल.
३. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : टिईएम-३३८२/१११८३६/(१९०) तांशि १अ, दिनांक २१.५.१९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.
४. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यांत यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादींबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.
५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.
६. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई [illegible] मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.
७. संचालक किंवा या संचालनालयाचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याचा अधिकार राहील.
८. शासन किंवा या संचालनालयाने किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना संस्थेचे निरीक्षण करुन त्या निरीक्षणाशी संस्थेत आढळून येणाऱ्या उणीवाबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.
९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण याच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधीत अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.
१०. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.
११. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही. तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.
१२. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन केलेत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास राहतील.
१३. सदर अभ्यासक्रमाच्या मान्यतेसाठी यापुढे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विचार केला तर सदर अभ्यासक्रमास आपणास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता घ्यावी लागेल व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता न मिळाल्यास सदर अभ्यासक्रम तात्काळ बंद करावा लागेल.

(प्रा. न.वा. पारलकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई
५. कार्यासन क्रमांक ३, २अ , मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.
६. निवडनस्ती.